**सत्र खटला क्र. ४६/२०२४ मधील फौजदारी जामीन अर्ज**
**सुरज दादासो झेंडे वि. महाराष्ट्र शासन**
**CNR NO. MHBU20-000700-2024)**

## नि.क्र. १२ खाली आदेश
## (पारीत दिनांक १७ डिसेंबर २०२४)

**०१]** अर्जदार – **सुरज दादासो झेंडे** याने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८३ अन्वये पोलीस ठाणे, जानेफळ येथील अपराध क्र. २०४/२०२४, कलम ३६४, ३६५, १२०(ब), ३०२ सह कलम ३४ भा.दं.वि. खालील प्रकरणात नियमित जामीन मिळण्यासाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला.

**०२]** अभियोग पक्षाच्या कथेनुसार फिर्यादीचे पती दिलीप इंगळे हा पैशाचा पाऊस पाडत होता. त्यामुळे दिलीप इंगळे आणि अमोल राजपुत यांचे मध्ये काही दिवसांपासून पैशाच्या व्यवहारावरून वाद चालू होता. म्हणून आरोपी अमोल राजपुत याने कट रचून, पूर्व नियोजन करून दिनांक २२.०६.२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजताच्या सुमारास संदीप उर्फ बाबुराव शेवाळे, योगेश तोंडे, शेख साजिद शेख अजीस यांच्या मदतीने संदीप दातार याची स्वीफ्ट गाडी क्र. एम.एच.–२८–बी.एच. १८२४ या वाहनात फिर्यादीच्या पतीला घातपात करण्याच्या उद्देशाने किंवा जिवे मारण्याच्या उद्देशाने जानेफळ येथून कोपरगाव, जि. अहमदनगर येथे नेले. त्यानंतर या आरोपींनी इतर अज्ञात इसमाच्या सहाय्याने फिर्यादीच्या पतीचे अपहरण घडवून आणल्याचे जबाबात सांगितले. फिर्यादी हिने पोलीस ठाणे, कोपरगाव, जि. अहमदनगर येथे फिर्याद दाखल केली. सदर फिर्याद पोलीस ठाणे, जानेफळ येथे ऑनलाईन पाठवण्यात आली. तपासादरम्यान फिर्यादीच्या पतीची निर्घृण हत्या करण्यात आली असल्याचे निष्पंन्न झाले. त्यामुळे पोलीस ठाणे, जानेफळ येथे अपराध क्र. २०४/२०२४ कलम ३६४,३६५,१२०(ब), ३०२ सह कलम ३४ भा.दं.वि. खाली गुन्हा नोंदवण्यात आला.

**०३]** अर्जदाराच्या वतीने विद्वान विधिज्ञ श्री. राजपाल बडगे यांनी युक्तिवाद केला

की, अर्जदार सुरज याला दिनांक ११.०७.२०२४ रोजी अटक करण्यात आली असून त्याचा या गुन्ह्याशी कोणताही संबध नाही. या प्रकरणातील मृतक दिलीप इंगळे हा जानेफळ येथील रहिवासी असून अर्जदार हा पुणे येथील रहिवासी असल्याने त्याचा या गुन्ह्याशी अर्थाअर्थी संबंध नाही. अर्जदाराने पींटु खोमणे या आरोपीला भाड्याने गाडी दिली. अर्जदाराचा हा भाड्याने गाडी देण्याचा व्यवसाय असल्याने त्याला या गुन्ह्याबाबत काहीही माहिती नाही. अर्जदार सुरज याचा दिलीप इंगळे याला मारण्याचा हेतू किंवा उद्देश नव्हता. अर्जदाराच्या गाडीत आरोपींना ने आण करण्यात आली इतकेच अर्जदाराचे कृत्य असून अर्जदाराच्या अनुषंगाने संपूर्ण तपास होऊन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. अर्जदाराची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. परिणामी अर्जदाराच्या अधीक कोठडीची आवश्यकता राहिलेली नाही. अर्जदाराला जामीन मिळाल्यास अर्जदार कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहे. म्हणून अर्जदाराला जामीन देण्याची विनंती केली.

०४] याउलट, विद्वान सरकारी वकील श्री. जी. जी. पोकळे यांनी तपासी अंमलदाराच्या म्हणण्यावर जोर देऊन जामीन अर्जावर प्रखर आक्षेप घेतला. त्यांनी युक्तिवाद केला की, घटनेच्या दिवशी अर्जदार हा दिलीप इंगळे याची हत्या करतांना इतर आरोपींसोबत घटनास्थळी हजर होता. अर्जदाराचा या गुन्ह्यात प्रथम दर्शनी सहभाग असल्याचे दिसून येते. सरकारी वकील सांहेबांनी पुढे असा युक्तिवाद केला की, प्रस्तुत प्रकरण हे अपहरण आणि हत्येचे असून परिस्थितीजन्य पुराव्यावर आधारीत आहे. अज्ञात आरोपींविरूद्ध तपास हा प्रारंभीक अवस्थेत आहे. मोबाईल आणि बोलेरो जीप जप्त होणे बाकी आहे. तसेच या गुन्ह्यात इतर अज्ञात आरोपींचा देखील समावेश आहे. त्यामुळे अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो तपासात अडथळा निर्माण करू शकतो व फरार/अज्ञात आरोपींची अटक टाळू शकतो. तसेच अभियोग पक्षाच्या साक्षीदारांना अर्जदार फितूर करू शकतो. म्हणून अर्जदाराचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आली.

०५] वरील युक्तिवादाच्या अनुषंगाने केस पेपरची पाहणी केली असता असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरण हे अपहरण, हत्येचा कट रचणे आणि हत्या करण्याचे असल्याने

गुन्ह्याचे स्वरूप अत्यंत गंभीर आहे. या प्रकरणातील मयत दिलीप इंगळे याची पाईपाच्या सहाय्याने निर्घृण हत्या करण्यात आली आहे. हत्येकरिता षडयंत्र रचण्यात येऊन बऱ्याच आरोपींची मदत घेण्यात आली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी अमोल राजपुत व इतर ५ ते ६ अज्ञात आरोपी अद्याप पर्यंत फरार आहेत.

**०६]** अर्जदार सुरज झेंडे हा दिनांक २२.०६.२०२४ रोजी त्याची ट्रिबर गाडी घेऊन घटनास्थळी ओळखीचे व अनोळखी इतर आरोपींसोबत हजर असल्याचे अभिलेखावरील बयाण व दस्तऐवजांवरून दिसून येते. अर्जदाराच्या गाडीमध्ये दिलीप इंगळे याला नेण्यात येऊन त्याची निघृण हत्या करण्यात आली. त्यामुळे अर्जदाराचा या गुन्ह्याशी प्रथम दर्शनी संबंध असल्याचे दिसून येते.

**०७]** या प्रकरणात बुलढाणा, अहमदनगर, शिर्डी, बारामती, कर्जत, पुणे येथील विवीध व अज्ञात आरोपींचा सहभाग असून गुन्ह्याचे स्वरूप क्लिष्ट आहे. त्यामुळे सर्व आरोपींच्या अटकेनंतर पुराव्याची जुळवा–जुळव होऊन प्रत्येक आरोपीचे कृत्य स्पष्ट होणार आहे. परिणामी अर्जदाराच्या कोठडीची आवश्यकता भासणार आहे. याशिवाय अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो फरार होऊ शकतो आणि साक्षीदारांवर दबाव आणू शकतो. शिवाय अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो फरार आरोपी व अज्ञात आरोपींना पलायन करण्यास मदत करू शकतो. एकंदरीत अर्जदाराने केलेल्या गुन्ह्याचे स्वरूप, गंभीरता, गुन्ह्यासाठी असलेली मृत्यूदंड शिक्षेची तरतूद, अर्जदाराचे कृत्य आणि तपासाची स्थिती पाहता अर्जदाराचा जामीन अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. करिता पुढील आदेश पारित करण्यात येतो.

**– आ दे श –**

जामीन अर्ज (नि.क्र. १२) नामंजूर करण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात लिखित व घोषित)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Date: 2024.12.18 17:21:46 +0530

**(सागर कृ मुंगीलवार)**
**अतिरिक्त सत्र न्यायाधीश**
**मेहकर**

**दिनांक – १७.१२.२०२४**
**ठिकाण – मेहकर**

मी, खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे /न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

न्यायालयाचे नांव – श्री. सागर कृ मुंगीलवार,
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मेहकर.

लघुलेखकाचे नांव – शेख इम्रान अब्दुल रऊफ,
लघुलेखक ग्रेड – २, मेहकर

दिनांक – १७.१२.२०२४